REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 10 | JULY - 2023

# स्काऊट – गाईड च्या माध्यमातून साधला शाळांचा विकास

**श्री. चिवडे बालासाहेब मोहनराव**
(सहशिक्षक)जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मसला (खुर्द)
ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**संशोधनाचे महत्त्व:-**



स्काऊट चळवळीचे संस्थापक लॉर्ड बेडन पॉवेल यांनी सन १९०७ साली स्काऊट चळवळ सुरु केली. या चळवळीच्या अनुषंगाने पुढे सन १९१३ साली कब शाखा सुरु झाली. कबींग ही स्काऊटींगची पूर्व पायरी आहे. ५ ते १० वयोगटातील मुलांच्या गरजा, प्रवृत्ती लक्षात घेऊन कबींगचा अभ्यासक्रम ठरविलेला आहे. कबींगमध्ये या वयोगटातील मुलांना खेळ, गोष्टी, गाणी, अभिनय, हस्तकला, निरीक्षण व जंगली वातावरण याद्वारे कुटुंब भावना निर्माण करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. कब पॅकचे वातावरण कौटुंबिक असते. कब मास्तर आई-वडिलांची भूमिका करतो. कब पॅकमधील मुले कुटुंब जीवन जगात असतात. यामध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिक लक्ष दिले जाते.

माझी प्रथम नेमणूक जून २००६ मधील आहे. जानेवारी २००७ मध्ये स्काऊट – गाईड जिल्हा कार्यालय उस्मानाबाद यांच्या मार्फत मी कब मास्तरचे बेसिक प्रशिक्षण घेतले. शालेय जीवनात विद्यार्थ्यांना शिस्त, स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा, सत्कर्म, नीटनेटकेपणा, परस्पर सहकार्य इ. सद्गुणांचे अनन्यसाधारण महत्व आहे. “प्रयत्नांची पराकाष्ठा करा ” (Do your best) या कबच्या ब्रीद वाक्यानुसार मी मागील १३ वर्षांपासून स्काऊट – गाईड चळवळीत सक्रीय आहे. लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी जून २००७ मध्ये जिल्हा परिषद शाळा, आरबळी, ता. तुळजापूर जि.उस्मानाबाद या द्वीशिक्षकी शाळेत पं. जवाहरलाल नेहरू कब युनिट ची स्थापना केली. या पथकामध्ये इ. २ री ते ४ थी मधील १८ विद्यार्थ्यांची नोंदणी केली. पालकांनी देखील स्वखर्चाने मुलांना कबचा गणवेश खरेदी केला. नियोजनाप्रमाणे कबचा अभ्यासक्रम चरण निहाय प्रात्यक्षिकासह सलग 10 वर्षे पूर्ण केला.

जून २०१६ मध्ये माझी प्रशासकीय बदली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रायखेल, ता. तुळजापूर जि.उस्मानाबाद येथे झाली. या शाळेत देखील इ. २ री ते ४ थी मधील १२ विद्यार्थ्यांचे कब युनिट स्थापन केले. पालकांना स्काऊट चळवळीचे महत्व पटवून सांगितले. पालकांकडून रक्कम जमा करून कब गणवेश खरेदी केले. युनिटच्या माध्यमातून कवायत संचालन, प्रभातफेरी नियंत्रण, परिसर स्वच्छता, वृक्षारोपण व संवर्धन आणि स्नेह संमेलनात स्वयंसेवकाची भूमिका इत्यादी कामे दोन वर्षे शिस्तबद्ध केली. वार्षिक नियोजनानुसार कबचा अभ्यासक्रम व प्रात्याक्षिके पूर्ण केली.

जून २०१८ मध्ये ऑनलाईन पद्धतीने माझी बदली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मसला (खुर्द) ता. तुळजापूर जि.उस्मानाबाद येथे झाली. या शाळेतही इ. २ री ते ४ थी मधील २४ विद्यार्थ्यांचे कब युनिट गणवेशासह तयार केले आहे. वार्षिक नियोजनाप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण केला.मागील तीन वर्षांपासून कब पथकाची यशस्वीपणे वाटचाल सुरु आहे.

मी सेवा केलेल्या तीनही शाळांमध्ये कब युनिटच्या माध्यमातून मूलशिक्षण प्रभावीपणे झाले. कब युनिटमध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांबरोबरच इतरही विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्ये रुजली गेली. कब दररोज किमान एकतरी सत्कर्म करत असतो. त्याची सवयच त्यांना लागलेली असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या डोक्यात सदैव चांगले विचार येत असतात. त्यातून चांगले काम केले जाते. यामुळे देशाचा आदर्श नागरिक घडला जातो.वैयक्तिक स्वच्छतेची सवय अंगी बाणली जाते. त्याचबरोबर सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता ठेवली पाहिजे याचे शिक्षण मिळते. यामुळे विद्यार्थी शाळा परिसर व वर्ग नियमितपणे स्वच्छ ठेवतात.कवायत संचलन, गटकार्य,प्रात्यक्षिके ,साहसी कसरती इत्यादींमुळे स्वयंशिस्त अंगी बाणली जाते.दररोजचा अभ्यास वेळेवर करणे,शाळेत वेळेवर येणे यातून वक्तशीरपणा रुजतो.युनिट लीडर च्या भूमिकेतून विद्यार्थ्यांना काम केल्यामुळे नेतृत्व गुणांचा विकास झाला.स्वतः चे कपडे स्वतः धुवणे,जेवणाचे ताट धुवणे, शर्टची बटणे लावणे, दप्तर आवरणे,घरातील कामात मदत करणे,शाळा व वर्ग स्वच्छ ठेवणे,तंबू मारणे,बिनभांड्याचा स्वयंपाक करणे,शालेय परिसरातील झाडांना पाणी घालणे, परसबागेतील कामे करणे इत्यादी कामांतून स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा ही मुल्ये रुजली गेली.कबमध्ये गणवेश परिधान करण्यात खूप नीटनेटकेपणा असतो.याची वारंवार जाणीव करून दिल्यामुळे सर्वच विद्यार्थ्यांच्या गणवेशात आणि वागण्यात नीटनेटकेपणा आला.स्काऊट-गाईड मधील प्रत्येक उपक्रमातून मुल्यशिक्षण होत असते.सर्वच उपक्रम प्रभावीपणे राबविल्यामुळे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांमध्ये जीवनमूल्ये रूजली गेली. याचा शाळेच्या विकासात भरपूर फायदा झाला.मूल्यशिक्षणाबरोबरच शाळांच्या भौतिक व तंत्रज्ञान विषयक सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी अनुकूल वातावरण तयार झाले.

### संशोधनाची गरज :-

१. कब युनिटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागली.
२. शाळेची गुणवत्ता वाढण्यास मदत झाली.
३. परिणामी बाहेरगावी शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी बंद झाले.
४. शाळेची पटसंख्या ४७ वरून ८६ झाली. शिक्षकाचे एक पद निर्माण झाले.
५. शाळेकडे बघण्याचा लोकांचा दृष्टीकोन बदलला. लोकसहभागातून ई-लर्निंग कक्षाची निर्मिती (रु. ३२२५०) संगणक संच (रु. २७०००) इ. कामे झाली.

### संशोधनाची उद्दिष्टे:-

1.स्काऊट चळवळीतून मुलांमध्ये देशप्रेम निर्माण करणे.
2.स्काऊट चळवळीतून मुलांमध्ये बंधूभाव निर्माण करणे.
3.स्काऊट चळवळीतून मुलांमध्ये सेवाभाव निर्माण करणे.
4.स्काऊट चळवळीतून मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे.
5.स्काऊट चळवळीतून मुलांमध्ये समता निर्माण करणे.

### जि. प. प्रा. शाळा, रायखेल शाळेस झालेला फायदा :-

१. सन २०१७ मध्ये एक विद्यार्थी राज्य पुरस्कार प्राप्त झाला.
२. शिक्षणासाठी तुळजापूर शहरात गेलेले विद्यार्थी या शाळेत परत आले.
३. जून २०१६ मध्ये असणारी शाळेची एकूण विद्यार्थी संख्या ५३ वरून वाढून ती जून २०१७ मध्ये ८३ झाली. शिक्षकाचे एक पद निर्माण झाले.
४. पालकांचा शाळेविषयीचा दृष्टीकोन बदलला. लोकसहभाग वाढला.
५. लोकवर्गणीतून ई –लर्निंग कक्षाची निर्मिती (३२,०००रुपये),संगणक संच(२७,५०० रुपये), शाळेची रंगरंगोटी(८५,००० रुपये), पाण्याची टाकी, हात धुण्याची व्यवस्था, गॅस कनेक्शन इ. कामे केली.

**जि. प. प्रा. शाळा,मसला (खु.) शाळेस झालेला फायदा :-**

१. सन २०१८-१९ मध्ये जिल्हा मेळाव्यात पथकाने 'बेस्ट कब' पुरस्कार मिळवला.
२. सन २०१८-१९ मध्येच पथकातील ४ विद्यार्थी 'राज्य पुरस्कार' प्राप्त झाले.
३. सन २०१९-२० मध्ये पथकातील ४ विद्यार्थ्यांना कबींग अभ्यासक्रमातील सर्वोच्च पदक म्हणजेच 'सुवर्णबाण पुरस्कार' (Golden Arrow Award) मिळाला.हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार असून कबना नॅशनल कमिशनर यांचे सहीचे प्रमाणपत्र व सुवर्णबाण पदक मिळते.

**कब मास्तर म्हणून मागील १३ वर्षांपासून पुढील कामे केली जातात :-**

१. दरवर्षी जिल्हा कार्यालयाकडे युनिट नोंदणी करणे.
२. वार्षिक नियोजना प्रमाणे चरण निहाय अभ्यासक्रम पूर्ण करणे. सर्व प्रात्यक्षिके शिकविणे.
३. प्राविण्य पदके बहाल करणे.
४. तृतीय चरण अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर राज्य कार्यालयाकडून प्रमाणपत्र उपलब्ध करून देणे.
५. दरवर्षी जिल्हा मेळाव्यात पथक सहभागी करणे.
६. दरवर्षी राज्यस्तरीय चाचणी शिबिरात सहभाग घेणे.
७. राष्ट्रीय सणांच्या वेळी कब गणवेशात प्रभातफेरी काढणे.
८. खरी कमाई, बाल आनंद मेळावा, स्नेहसंमेलन, बाजारहाट, प्लास्टिक गोळा करणे, शालेय परिसर स्वच्छता, इ. प्रसंगी कबचे विद्यार्थी कब गणवेशात स्वयंसेवकाची भूमिका बजावतात.

**सारांश:-**

स्काऊट – गाईड चळवळीच्या माधमातून मुलांमध्ये समता, बंधुभाव, एकता, प्रामाणिकपणा, सेवाभाव, देशप्रेम , वैज्ञानिक दृष्टीकोन जाणीव व घातक रूढी निर्मुलन इत्यादी गुण निर्माण करून त्याला देशाचा आदर्श नागरिक बनविण्याची. दिशा दाखविली जाते.